RNI MAHMAR
36829-2010

ISSN-2229-4929

Peer Reviewed

# Akshar Wangmay


International Research Journal
UGC-CARE LISTED

Special Issue - II

**Interdisciplinary View on Socio-Economic, Educational, Management, Environmental, Research, Language and Sustainable Development in Covid-19 Pandemic Situation**



January 2021






**Chief Editor : Dr. Nanasaheb Suryawanshi**

**Executive Editor : Prof. Kartik R. Patil**

**Principal,**
Rashtrasant Tukdoji College, Chimur
Ta-Chimur, Dist-Chandrapur (Maharashtra)

**Co-Editor : P. M. Rajurwade**





Address
'Pranav', Rukmenagar,
Thodga Road, Ahmadpur, Dist- Latur 413515 (MS)

Scanned with OKEN Scanner

## CONTENTS


| Sr. No. | Paper Title | Page No. |
|---|---|---|
| 1. | Wine Tourism – A Case Study of Sula Vineyard of Nashik District<br>**Dr. Dattatraya Harpale, Dr. Smita Harane** | 1-4 |
| 2 | A Geographical Study of Kalmuste Tribal Village, of Nashik District<br>**Dr. Dattatraya Harpale, Dr. Smita Harane** | 5-9 |
| 3 | Online learning during COVID-19 pandemic: Challenges faced by parents<br>**Dr. Franky Rani, Dr. Gagandeep Kaur** | 10-12 |
| 4 | Impact of Covid-19 on Indian Economy<br>**Mr. Santosh Ananda Keskar** | 13-15 |
| 5 | Relevance of Pandemic Literature during Covid-19<br>**Dr. Inayat Chaudhary** | 16-18 |
| 6 | Green Finance: A Conceptual Analysis with Special Reference to India<br>**Dr. Sajoy P.B.** | 19-22 |
| 7 | Humanities: The Saviour of Human Sufferings<br>**Dr. Sarika Kanjlia** | 23-25 |
| 8 | Changing Land Use: A Environmental Analysis of Parner Tehsil in Ahmednagar District (M.S.)<br>**Jyotsna D, Mhaske** | 26-28 |
| 9 | Impact of Pandemic Covid-19 on Education<br>**Mrs. Minal S. Bhoyar** | 29-32 |
| 10 | Socializing the Restricted Corpus: Emergence of New Vocabulary during COVID-19 Pandemic<br>**Dr. Gajanan Pandurang Patil** | 33-36 |
| 11 | Impact of MGNREGA on the Socio-Economic Conditions of People in Rural Areas of Jalpaiguri District, West Bengal<br>**Dr. Ranjita Roy Sarkar** | 37-39 |
| 12 | Geographical Analysis of Industrial Development In Goa-Post Liberation Period.<br>**Dr. Dadapir M. JakatiDr. B. K. Haravi** | 40-44 |
| 13 | Ethics of Researches in Social Sciences<br>**Prof. Dr. Baviskar K.V.** | 45-46 |
| 14 | Impact of Pandemic Covid-19 on Education With Reference to The Challenges Faced By Students in Online Learning Process<br>**Dr. Baviskar KundaVitthal** | 47-49 |
| 15 | Impact of covid-19 on cashless transaction system in India<br>**Prof. Dr. B. S. Wankhede, Ms. Manisha Dnyanoba Pawar** | 50-52 |
| 16 | Current situation of Covid-19 and its Global Impact on Food sector<br>**Dr. Pramod P. Waghmare,** | 53-55 |
| 17 | Assessment and Management of Agricultural Land Use, A Case Study of Baglan Tahsil Nashik, Maharashtra.<br>**Ravindra S. Medhe and Yogesh P. Badhe** | 56-59 |
| 18 | Being "Vocal for Local" and Underscoring Multilingualism: An Appraisal of the Linguistic Vision in NEP 2020<br>**Dr. Asit Panda** | 60-63 |
| 19 | Mythological Abstract Designing through CAD: A Review<br>**Itee Ojha and Sangita Srivastava** | 64-68 |
| 20 | A Study on Digital Marketing in the Modern Age<br>**Dr. Vivek V. Nagbhidkar** | 69-71 |
| 21 | A Study of Impact of Online Education on Students and Parents in Maharashtra State<br>**Dr. Ajay K. Dixit[1] Dr. Deepak S. Narkhede[2]** | 72-74 |
| 22 | A Study of Impact of Lockdown Period on Women in Maharashtra<br>**Deepak S. Narkhede[1] Dr. Ajay K. Dixit[2]** | 75-77 |
| 23 | Promoting Physical Education at College Level for Developing Mental Health among the Students<br>**Dr. Toravi S. S.** | 78-80 |


Scanned with OKEN Scanner

| | | |
|---|---|---|
| 24 | Impact of Corona virus pandemic (Covid 19)<br>**Ritesh R. Naik** | 81-82 |
| 25 | Impact of COVID-19 Pandemic on Teaching, Learning and Evaluation<br>**Prof. M. B. Bhaisare** | 83-85 |
| 26 | Environmental Analysis of Changing Land Use And Cropping Pattern: A Case Study of Ahmednagar District (M.S.)<br>**Ashok Vitthal Thokal, Dr. Ankush B. Aher** | 86-88 |
| 27 | NBFC – Special Borrowing Window: Borrower's Perspective Submitted by<br>**Reshma M. R., Dr. M. Geetha** | 89-91 |
| 28 | Investment climate is favorable in Kerala for setting up small cement Industries<br>**Dr. P. Chellasamy, K.V. Lige** | 92-95 |
| 29 | Swachh Bharat Mission Urban Overview In India<br>**Mr. Dhananjay Shivaji Kadam Mr.Vitthal Saraji Asawale** | 96-99 |
| 30 | Socio-Economic Status of Girgaon Village In Shahuwadi Tahsil: A Case Study<br>**Dr. M. D. Kadam, Dr. B. B. Ghurake, Mr. Santosh P. Mane** | 100-104 |
| 31 | Environmental Analysis ofClimatic Elementsof Ahmednagar District (M.S.)<br>**Dattatray S. Ghungarde Jyotiram C. More** | 105-107 |
| 32 | Changing Roles Of Education And Teacher In The Covid - 19 Pandemic Situations to Face Globalization<br>**Dr. Chandrakant Lonkar, Asst. Prof. Sujata Kuldipake** | 108-111 |
| 33 | Morphometric Analysis of Man River Basin in Western Maharashtra<br>**Dr. Govindrao Uttam Todkari** | 112-118 |
| 34 | Unemployment Situation in India and Impact of COVID-19<br>**Mr. Ashish Bhasme** | 119-121 |
| 34 | कळंब तालुक्यातील पारधी जमातीच्या सामाजिक समस्यांचा अभ्यास<br>**प्रा. ईश्वर लक्ष्मण राठोड** | 122-125 |
| 35 | कोविड- १९ का शिक्षा कि प्रकीया एव रोजगार पर प्रभाव<br>**डॉ. नितीन सुरेशराव कायरकर** | 126-128 |
| 36 | माहिती तंत्रज्ञानात मराठी भाषेचे स्थान<br>**प्रा. डॉ. मीनाक्षी पुंडलिक पाटील** | 129-130 |
| 37 | शाश्वत विकास: भावी पिढ्यांच्या अस्तित्वासाठी<br>**डॉ. संजय अंकुश काळे** | 131-133 |
| 38 | कोविड-19 चा कृषक जीवनावर झालेला परिणाम<br>**डॉ. सचिन पत्रुजी भोगेकार** | 134-136 |
| 39 | उद्योग क्षेत्रात महिलांची वाटचाल<br>**डॉ. अनिरुद्ध सुनील गचके, कु. भावना रमेश उरकुडे** | 137-138 |
| 40 | कोवीड 19 महामारीचा स्थलांतरीत कामगारावर परिणाम<br>**प्रा. डॉ. भास्कर लक्ष्मणराव लेनगुरे** | 139-142 |
| 41 | कोविड १९ चा भारतीय अर्थव्यवस्थेसमोरील आव्हाने व परिणाम<br>**Dr. Dinesh Yadavrao Parkhe** | 143-146 |
| 42 | भंडारा जिल्ह्यातील भूमिहीन शेतमजुरांच्या सामजिक व आर्थिक स्थितीचे अध्ययन<br>**प्रा. डॉ. चंद्रशेखर आर. भेजे** | 147-150 |
| 43 | कोरोना आणि मानवी जीवन शैली<br>**डॉ. माया बी. मसराम** | 151-153 |
| 44 | साहित्य आणि Covid-19 सद्यस्थिती<br>**डॉ. दीपक गायकवाड** | 154-156 |
| 45 | कोरोना महामारी आणि ऑनलाईन शिक्षणातील सकारात्मक पैलू<br>**प्रा. गजानन रामजी घुमडे** | 157-159 |
| 46 | भारत- आसियान संबंधावर कोरोना- 19 महामारी चा परिणाम एक अभ्यास | 160-162 |


Scanned with OKEN Scanner

| | | |
|---|---|---|
| | डॉ. अशोक रामसिंग वसावे | |
| 47 | कोव्हीड - 19 या महामारीमुळे नौकरी करणार्या विवाहित स्त्रियांवर झालेला शारीरिक व मानसिक परिणाम.<br>प्रा. अनिल रा. गावंड. प्रा. डॉ. श्याम एस. खंडारे | 163-164 |
| 48 | वेळापूर येथील अर्धनारी नटेश्वर : यात्रा उत्सवाचा चिकित्सक अभ्यास<br>प्रा. डॉ. शिवाजी मारुती वाघमोडे, श्री. तेलसंग हनमंत भिमराव | 165-166 |
| 49 | कोविड १९ च्या दुष्परिणामामुळे महिला हिंसाचारात झालेल्या वृध्दीचे अध्ययन<br>डॉ. विजया एच. राऊत | 167-170 |
| 50 | कोविड -१९ आणि राजकीय संस्थांसमोरील आव्हाने<br>डॉ. प्रभाकर रघुनाथ जगताप | 171-173 |
| 51 | संगमनेर शहरातील माध्यमिक स्तरावरील विज्ञान विषयाची प्रात्यक्षिके व त्यांच्या परीक्षा संदर्भातील वस्तुस्थितीचा चिकित्सक अभ्यास करणे<br>सौ लोंढे एस .आर. | 174-177 |
| 52 | चेंबूर परिसरामधील विद्यार्थ्यांच्या रासायनिक अभिक्रिया लेखनात होणाऱ्या चुका व त्या संदर्भातील कारणांचा चिकित्सक अभ्यास करणे.<br>सौ लोंढे एस. आर. | 178-181 |


Scanned with OKEN Scanner

# माहिती तंत्रज्ञानात मराठी भाषेचे स्थान

प्रा. डॉ. मीनाक्षी पुंडलिक पाटील
श्रीमती पुष्पाताई हिरे महिला महाविद्यालय, मालेगाव, नाशिक

प्रस्तावना –

दरवर्षी मराठी दिन आला की मराठी दिनाचा नेहमीचा एक ठरलेला साचेबंध कार्यक्रम डोळयासमोर येतो आणि सर्व वर्तमानपत्रांना एकच गहन प्रश्न पडतो की, मराठीच काय होणार? दरवर्षी असचं भाषा मरते, मरते म्हणून ओरड होते आणि मग नेहमीप्रमाणे सगळे आरोप येऊन थांबतात ते तरुण पिढीवर. आजची तरुण पिढी शुध्द मराठी बोलतच नाही. त्यांच्या मराठी बोलण्यात मराठीपेक्षा इंग्रजीच जास्त असतं. आजची पिढी नेमकी कोणत्या भाषेत बोलते हेच कळत नाही. सारच अर्धवट आहे. मराठी, हिंदी आणि इंग्रजी अशा तिन्ही भाषांमधून आजची पिढी बोलतेच याच्या पुढची पिढी तर कदाचित मराठीतून बोलणारच नाही मग भाषा जिवंत राहील कशी? असा आरोप सतत होतांना दिसतो. तसे पाहता हे वरवरचे चित्र आहे. सत्य मात्र वेगळे आहे.

माहिती तंत्रज्ञान व मराठी–

मराठी भाषक समाज महाराष्ट्रातील व बृहन्महाराष्ट्रातील मराठी भाषकांचा मिळून एकत्रितपणे ओळखला जातो. प्रत्येक भाषेचे म्हणून एक "भाषिक भांडार" असते. समाजातील व्यावसायिकांनी या भाषिक भांडारात महत्वपुर्ण भर घातलेली असते. सर्वसामान्य स्वरुपाच्या दैनंदिन व्यवहारात या भाषिक भांडाराचा उपयोग सामाजिक संकेतसरणीनुसार होत असतो परंतु त्या त्या व्यवसायाच्या लघुक्षेत्रात "व्यवसायाविशिष्ट बोली" (रजिष्टर) चा प्रयोग होत असतो. उदाहरणार्थ विणकरांचा भाषाव्यवहार, हातमागावर काम करणाऱ्या मजुरांना रीळाचा धागा संपला की नवी रिळे भरुन येईपर्यंत काम नसते. या दहा पंधरा दिवसांच्या काळात ओढवलेल्या बेकारीचा उल्लेख ते तार तुटली असा करतात. अशी अनेक उदाहरणे देता येतील. अशा अनेक मार्गांनी भाषा उत्क्रांत होत असते.

भाषा आणि संस्कृती या प्रवाही गोष्टी असतात हे मान्य पण प्रवाही असणं आणि प्रवाहात संपून जाणं या वेगळ्या गोष्टी आहेत. भाषावार प्रांतरचनेनंतर जे राज्य आपण मिळवल ते युरोपातल्या अनेक भाषिक समाज घट्ट राजकीय ओळख टिकवत स्वतःच्या भाषा आणि संस्कृतीच्या उत्कर्षाला सहाय्यभूत झाल्याचे दिसते. इतकी तीव्र मराठीपणाची जाणीव आपल्या समाजात नसण्याचं कारण आपण आपल्या मनावर लादून घेतलेले अनावश्यक ओझे हे आहे. या देशात राहायचे, भारतीयत्व स्वीकारायचे याचा अर्थ मराठीपणाबद्दल लाज बाळगायची किंवा त्याला तिलांजली द्यायची असा होत नाही. आपण ज्या संघराज्यात्मक चौकटीत आहोत त्यात प्रादेशिक अस्मितांच्या न्याय्य विकासाला दरवेळी पुरेसा अवकाश मिळतोच असं नाही. तो अवकाश मिळवणं ही ह्या पुढच्या काळातील मराठी समाजापुढची महत्वाची गरज आहे. ती पार पाडली नाही तर आपण महाराष्ट्राच नुकसान करुच पण देशाचाही करु. भाषेच्या नियोजनाबद्दलची आपली जाणीव तीव्र होणं जस गरजेच आहे तस या देशाला उपलब्ध राजकीय चौकटीचा पुनर्विचार करणंही गरजेच आहे.

हाच विचार लक्षात घेऊन नवी बहुभाषिक तंत्रविद्या मराठीला लाभदायक आहे असे वाटते. आजही आपल्या भाषेचा विचार संगणकाशी जोडून जेव्हा होतो तेव्हा तो प्रामुख्याने मुद्रणकेंद्री असतो. टंकलेखनाचा पर्याय म्हणून आपण संगणकाकडे पाहतो. भाषा आणि संगणक यांच्या संबंधाचा विचार खरं तर याहून अधिक खोलात जाऊन करायला हवा. माहिती तंत्रज्ञान हा आजच्या काळातला कळीचा शब्द आहे. ही ज्ञानशाखा माहिती नोंदवण्याचे, ती नेटकेपणाने मांडण्याचे ही ती माहिती सहज हुडकण्याचे, माहितीचे देवाणघेवाण सुकर करण्याचे नवे नवे मार्ग चोखाळते आहे. मानवी समूहात या माहितीच्या देवाणघेवाणीचे महत्त्वाचे माध्यम भाषा हेच आहे. त्यामुळेच मानवी भाषेतील माहितीवर संगणकाच्या साहाय्याने विविध प्रक्रिया कशा करता येतील याचा अभ्यास करणारी भाषासंस्करण ही ज्ञानशाखा निर्माण झाली. मानवी भाषा वापरणाऱ्या संवादकुशल संगणक प्रणाल्या कशा रचता येतील यावर या शाखेत संशोधन होत असतं. भाषेचं उच्चारीत रुप आणि लिखित रुप या दोहोंचाही अभ्यास संगणक प्रक्रियेच्या दृष्टीने होत असतो. जगातील विविध भाषांसाठी विविध संगणकीय साधनं मोठया प्रमाणावर उपलब्ध होत आहेत. मराठी भाषेसाठी आपल्या समाजात यापैकी कार्य चाललं आहे याचा शोध घेत गेलो तर निराशाच पदरी येईल. नव्या तंत्रविद्येशी आपल्या भाषेला जोडण्याच स्वप्नही आपल्याला अद्याप पडलेलं नाही ही एक मोठी शोकांतिकाच आहे. संगणकावर मानवी भाषेचा वापर करण्याचं अगदी प्राथमिक स्वरूपाच उदाहरण म्हणजे संगणकाच्या पडद्यावर आपल्याला आपल्या भाषेच्या लिपीतली चिन्हे, त्यातील मांडणीच्या वैशिष्ट्यांसह दिसणे हे एक उदाहरण जरी विस्ताराने पाहिले तर मराठीची स्थिती काय आहे ते कळेल. संगणकाचा विकास हा मुख्यतः अमेरीका खंडात झाल्याने तिथे वापरण्यात येणारी रोमी (रोमन) लिपी ही संगणक मानव संवादातली वापरण्यात आली. पण याचा अर्थ असा नव्हे की ती लिपी संगणकाला कळते. संगणकाला कोणतीच मानवी भाषा अथवा त्या भाषेची लिपी त्याअर्थी कळत नाही. फक्त ०, १, या दोन आकडयातून साकारणाऱ्या द्विमानी संख्येचा शुन्यैकी संकेत कळतो. ती खरी संगणकाची भाषा आहे पण त्या भाषेत संगणकाला सगळया आज्ञा देणं हे माणसांना कठीण आहे त्यासाठी माणसांना संगणकाकरता आज्ञावल्या रचणं सुकर करणाऱ्या आज्ञावली भाषा रचण्यात आल्या.

खरंतर जगातील बहुतेक सर्व लिप्यांची व्यवस्था लावणारी युनिकोड ही संकेतप्रणाली २००० सालानंतर संगणकीय भाषा प्रक्रियात प्रामुख्याने वापरली जाते. ती वापरुन इंग्रजी इतक्याच सहजतेने संगणकावर मराठी वापरण शक्य आहे. आपल्या घरातल्या संगणकावर ती आपलीच असते. त्यासाठी एकही पैसा वेचावा लागत नाही. पण अजूनही बहुतांश मराठी लोकांना तिचा पत्ता सापडला की



Scanned with OKEN Scanner

नाही हा मोठा प्रश्नच आहे. मराठी प्रसारमाध्यमातही मोजके अपवाद वगळता मराठीसाठी मागासलेल तंत्रज्ञान वापरण्याची चढाओढ लागलेली आहे. जी वृत्तपत्र आपल्या संगणकीय आवृत्यांसाठी युनिकोड या संकेत प्रणालीचा वापर करतात. त्यांनीही लोकात हे तंत्रज्ञान पोहचवण्यासाठी निकराने प्रयत्न केलेले आढळत नाही. केंद्र शासनाने युनिकोड ही संकेत प्रणाली भारतीय भाषांकरीता प्रमाणित प्रणाली म्हणून वापरावी अस ज्ञापन काढल आहे. महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक धोरणातही या गोष्टीचा अंतर्भाव आहे. पण अजूनही आपण प्राथमिक गोष्टीत अडकलो आहोत. निकालात निघालेल्या प्रश्नांवरच चर्चा करत आहोत.

याउलट जगातल्या इतर भाषा आणि लिप्या यांच्या संदर्भात काय घडतं आहे? महाजालावर इंग्रजी भाषेत ज्ञानाचा मोठा साठा आहे हे आपल्याला माहीत आहे. पण हा साठा आता बहुभाषिक होऊ लागला आहे. याकडे मात्र आपण पुरेस लक्ष द्यायला हवं. विविध भाषा हा ज्ञानाच्या देवाणघेवाणीतला अडसर नसून तो मानवी संस्कृतीतून निर्माण झालेला मोठा ठेवा आहे. अशी जाणीव जगभरात निर्माण होते आहे. त्यामुळे संगणक तंत्रज्ञानही बहुभाषिक होत आहे अशी जाणीव जगभरात निर्माण होत आहे. त्यामुळेच संगणक तंत्रज्ञानही बहुभाषिक होत आहे. मराठीच्या संदर्भात मात्र उलटच होतांना दिसते. आपण आपल्या सांस्कृतिक ठेव्याला ओझं मानत आहोत. मराठी शाळा बंद पडत आहेत. ज्ञान व्यवहारातून मराठीच्या उच्चाटनाचे जोरदार प्रयत्न चालू आहेत. जगातील एका ठिकाणी निर्माण झालेली उत्पादनं दुसऱ्या ठिकाणीही सहज उपलब्ध करणाऱ्या जागतिकी भवनाविषयी आपण नेहमी बोलतो. पण लोकांच्या स्थानिक आवश्यकता लक्षात घेऊन ती उत्पादनं तयार करण्याचा म्हणजेच स्थानिकीकरणाचा विचारही जगात बळावतो आहे हे लक्षात घेतलं पहिजे.

महाजालावर विविध भाषात माहितीचा साठा आहे. तो केवळ इंग्रजीतच आहे असं नाही. आपल्याला हवी असलेली माहिती ही विविध भाषात असणार आहे. आपण आपल्याला येत असलेल्या भाषेतून शोध घेऊ पण त्या शोध मजकूराचा अर्थ उमजून त्या अर्थाची इतर भाषांतली माहितीही संगणकाने उपलब्ध करून द्यावी यासाठी प्रयत्न होत आहेत. युरोपातल्या भाषांसाठी आजही बऱ्याच प्रमाणात चांगल्या संधी उपलब्ध आहेत भाषांतर ही मुळातच कठीण गोष्ट आहे. पण तीही संगणकाच्या कवेत आणण्यासाठी प्रयत्न होत आहेत. गुगलसारख्या संस्था विविध भाषांतील स्वामित्वयुक्त अस वाङ्मय संगणकीय स्वरुपात आणण्यात पुढाकार घेत आहेत. आपल्या विद्यापीठांच्या विविध ग्रंथालयातील जुन्या मराठी नियतकालीकांचे अंक मात्र नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत. महाजालावरील संकेत स्थळाचे पत्ते लोकांना आपापल्या लिप्यातून कसे लिहिता येतील यावर प्रायोगिक तत्वावर संशोधन चाललं आहे. सी-डॅक ही संस्था भारतीय भाषा संदर्भात याविषयी काम करत आहे. बोललेला मजकूर संगणकाने एखाद्या भाषेच्या लिपीत लिहून द्यावा, लिखित मजकूर वाचून दाखववा यासाठी संगणक प्रणाल्या निर्माण झाल्या आहेत पण त्या अजूनही आपल्या भाषांसाठी नाहीत जिथे जिथे म्हणून मानवी भाषा आणि त्यांच्या लिप्यांचा वापर होतो तिथे तिथे संगणकीय तंत्रविद्या वापरण्याचे प्रयत्न होत आहेत

**समारोप :**

**हे सर्व पाहता येत्या काळात मराठी भाषेच संगणकावर भवितव्य काय असेल हे आता आपण म्हणजे मराठी माणसांनीच ठरवायच आहे. तंत्रज्ञानाच्या साहाय्याने मराठीचा वापर कसा वाढेल आणि तो आर्थिक व्यवहारात, सामाजिक व्यवहारात, राजकीय व्यवहारात आणि ज्ञान व्यवहारात कसा विस्तारेल हा विचार केला पाहिजे. सर्व जण इंग्रजीच किंवा आपली भाषा वगळता इतर भाषाच वापरणार आहे हा अपसमज आपण सोडला आणि प्रत्येक प्रकारचा व्यवहार मराठीतून आग्रहाने आणि सातत्याने करत राहिलो तर आपल्या भाषेला चांगले दिवस नक्कीच येतील आणि त्यासाठी बहुभाषिक होत चाललेली तंत्रविद्या नक्कीच साहाय्य करील.**

**संदर्भ :-**


1. **लोकप्रभा - मार्च २०१०**
2. **वरखेडे रमेश, समाजभाषाविज्ञान, शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, प्रथम**
3. **आवृत्ती १९९२.**